Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-2 | Aug-2014
Available online at www.aygrt.isrj.org

संत तुकाराम : व्यक्तित्त्व आणि कवित्त्व

डॉ. माधव बसवंते

सारांश

संत तुकाराम हे सतराव्या शतकातील मध्ययुगीन संतकवी होते. त्यांची अभंगवाणी व त्यांचे व्यक्तिमत्त्व हे मेणाहून मऊ आणि वज्रापेक्षाही कठोर होते. त्यांची कविता वैश्विक आहे. ती बंडखोर आहे व बहुसंवादी आहे. तुकारामांच्या काव्यातील त्यांची उपदेशवाणी ही वेदाहूनही श्रेष्ठ आहे. त्यांच्या चिंतनाला विवेकाचे अधिष्ठान आहे म्हणूनच ते तत्कालीन समाज जीवनाचे भाष्यकार ठरतात. अनिष्ठ रुढी परंपरा, ढोंगी साधू, ढोंगीपणा, भिक्षावृत्ती, अंधश्रद्धा व क्षुद्र दैवतांवर संत तुकारामांनी कठोर शब्दात टीकास्त्र सोडले आहे.

बीजसंज्ञा : संत तुकाराम, कविता, अभंग, काव्य प्रतिमासृष्टी, काव्याची भाषा, चिंतनशीलता, भक्तियोग, सामाजिकता, वाङ्मयीन श्रेष्ठत्व.

प्रस्तावना

संत तुकाराम हे सतराव्या शतकातील एक वारकरी संत होते. वारकरी संप्रदायातील समुदाय त्यांना जगत्गुरु या नावाने ओळखतात. विठ्ठोबा अर्थात विठ्ठल हा संत तुकारामांचा आराध्यदेव होता.'विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ ।।' ही प्रमुख भूमिका घेवून संत तुकारामांनी सतराव्या शतकात ऐक्यभाव आणि समता प्रस्थापित केली. संत तुकाराम हे निर्भीड बंडखोर मध्ययुगीन संतकवी होते. विशिष्ट वर्गाची पांरपरिक मक्तेदारी असलेला वेदान्त हा संत तुकारामांनी आपल्या अभंगवाणीच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचविला. मराठीतील पहिले आधुनिक कवी तुकारामांचा निर्देश करावा लागतो. ते परखड कवी होते. पाखंडी, अन्यायी, अभक्त, पापी, अंधश्रद्धा आणि देवदेवतावर तुकारामांनी आपल्या अभंगवाणीतून कठोर प्रहार केले आहेत. यामुळे ते तत्त्वचिंतक आणि समाजनमस्क लोककवी आहेत. लीनता, नम्रता आणि करुणा यांचे दर्शन त्यांच्या अभंगातून होते. म्हणूनच त्यांचे व्यक्तित्त्व आणि कवित्व एकरुपच आहेत. संतु तुकारामाच्या अभंगातील उपमानसृष्टी व प्रतिमासृष्टी संपन्न आहे. संत ज्ञानेश्वरापासून ते संत एकनाथपर्यंत या संतकवींनी अभंग हा काव्यप्रकार लोकप्रिय केला असला, तरी संत तुकारामांच्या लेखणीने अभंगाचे सोने केले आहे. कोणत्याही माणसांचे मोठेपण अथवा श्रेष्ठत्व हे त्यांच्या जाती वर्ण कुळावरुन ठरत नाही, तर त्या व्यक्तिची चित्तशुद्धी व प्रेमळ वर्तन यावरुन ठरते असे परखडपणे तुकारामांनी तत्कालिन धर्ममार्तंडांना ठणकावून सांगितले. संत तुकारामांची कविता, त्यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी, त्यांच्या कवितेची भाषा, त्यांची चिंतनशीलता आणि संत तुकारामांचा भक्तियोग हा विलक्षण आहे. तुकाराम सर्वात्वभावी आहेत. मनुष्याच्या सर्वस्पर्शी आकांताला तुकारामांनी तोंड फोडलेले आहे, वाचा फोडलेली आहे. म्हणूनच संत तुकारामांच्या अभंगातील त्यांची भूमिका ही शोधकाची व बोधकाची आहे. त्यांचे चिंतन हे जीवनमंथन आहे. म्हणूनच संत तुकाराम हे तत्कालीन जीवनाचे श्रेष्ठ भाष्यकार ठरतात. त्यांनी आपल्या अभंगात मानवी जीवनाची शाश्वत मूल्ये रोखठोकपणे मांडली आहेत. म्हणूनच त्यांच्या अभंगवाणीला पंचमवेद म्हटले जाते. वेदात केवळ तीन वर्णांचाच विचार करण्यात आला आहे, परंतु संत तुकारामांची अभंगवाणी ही वेदापेक्षाही श्रेष्ठ आहे. कारण संत तुकारामाच्या अभंगवाणीत विश्वातील मानव जातीच्या कल्याणाची चिंतनशीलता आहे. म्हणूनच संत तुकारामांचे अभंग अक्षर वाङ्मय आहे.

संत तुकाराम : जीवनालेख

सतराव्या शतकातील वारकरी संप्रदायाच्या मध्ययुगीन संत मालिकेतील संत तुकाराम हे अखेरचे संत आहेत. आळंदीजवळ असलेल्या इंद्रायणीकाठच्या देहूक्षेत्रातील कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वंशपरंपरेने भगवत्भक्त घराणे म्हणूनच त्यांचे घराणे प्रसिद्ध होते.

त्यांच्या घराण्यात साधारणतः आठ पिढ्या विठ्ठलाची उपासना करण्याची परंपरा चालत आलेली होती. तुकारामांचे घराणे मोरे क्षत्रिय आणि आडनाव अंबिले आहे. मोरे घराण्याचे मूळ पुरुष विश्वंबरबुवा हे विठ्ठलभक्त होते. संत तुकारामाच्या जन्मवर्षाविषयी इतिहासकारामध्ये अनेक मतभेद आहेत. त्यात प्रा. द.वा. पटवर्धन यांनी तुकारामांचा जन्म शके १५२८ या दिवशी झाल्याचे म्हटले आहे. प्रा. ल.रा. नसिराबादकर यांनी जन्मशके १५२० मानला आहे. तर डॉ. शं.दा. पेंडसे, डॉ. शंकर अभ्यंकर, डॉ. निर्मलकुमार फडकुले, प्रा. भालचंद्र नेमाडे, मुकुंद दातार यासारख्या अनेक अभ्यासकांनी संत तुकारामाचा जन्मशक १५३० मानला आहे. तुकारामांच्या वडिलांचे नाव बोल्होबा अंबिले होते, तर आईचे नाव कनकाई होते. असे सांगितले जाते की, तुकारामाचे दोन विवाह झाले. पहिल्या विवाहाच्या वेळी तुकाराम हे तेरा वर्षाचे होते. त्यांच्या पहिल्या पत्नीचे नाव रखुमाबाई होते. या रखुमाबाईला दम्याची बिमारी असल्यामुळे पुणे येथील श्रीमंत सावकार आप्पाजी गुळवे यांची कन्या जिजाई ऊर्फ आवली हिच्यासोबत तुकारामाचा दुसरा विवाह झाला. तुकाराम सतरा वर्षाचे असताना त्यांच्या आई वडिलांचे निधन झाले. त्यामुळे घरची संपूर्ण जबाबदारी तुकारामांना स्वीकारावी लागली. पुढे इ.स. १६२८ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता. अन्न पाण्याअभावी माणसं, पशूपक्षी, गुरेढोरे भूकेने मृत्यू पावली. त्यातच त्यांची पहिली पत्नी रखुमाबाई यांचाही मृत्यू झाला. मोठ्या मुलाचाही मृत्यू झाला. यामुळे तुकारामाच्या मनावर मोठा आघात झाला. दारिद्र्य व अपमान यामुळे तुकारामाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. ते एकदाचे दुःखी व उदासीन होऊन प्रपंच व व्यवसायाकडे अखेर पाठ फिरविली आणि ते प्रपंचाकडून परमार्थाकडे वळले.

संत तुकाराम यांच्या वयाच्या साधारणतः एकवीसाव्या-बाविसाव्या वर्षात त्यांच्या जीवनाची दिशाच बदलली. घराण्यातील वाटण्या झाल्यानंतर त्यांनी एक वाटा आपल्या भावाला दिला व स्वतःच्या वाटणीची सर्वच्या सर्व खतपत्रे त्यांनी इंद्रायणी नदीत बुडवून एकदाचे मोकळे झाले. उरलेल्या द्रव्यातून विश्वंबर बाबांनी बांधलेल्या विठ्ठल मंदिराचा जीर्णोद्धार केला. त्यानंतर पुढे तुकारामावरील कर्जाचा डोंगर वाढत गेला. कर्जदार घरी येऊ लागले. त्यामुळे घरात भांडणे होऊ लागली. यातून त्यांनी अनासक्त वृत्तीमुळे अखेर गृहत्याग केला आणि देहूजवळ असलेल्या भांबगिरी नावाच्या डोंगरावर पारमार्थिक चिंतनासाठी निघून गेले. या डोंगरावर त्यांनी विठ्ठलाचे चिंतन केले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ यांची वचने अभ्यासली, त्यांची परायणे केली. त्यानंतर गावा-गावात जाऊन भजन-कीर्तन करु लागले. अनेक अभ्यासकांनी बाबाजी चैतन्य यांना तुकारामाचे गुरु मानतात. परंतु अनेक विचारवंतांच्या मतानुसार संत तुकारामांनी साक्षात पांडुरंगालाच आपले गुरू मानले होते. 'नामदेव केले स्वप्नामाजी जागे। सर्व पांडुरंगे येऊनिया।' या त्यांच्या अभंगावरुन नामदेवांनी प्रत्यक्ष पांडुरंगासवे तुकारामांच्या स्वप्नात येऊन त्यांना काव्य करण्याची आज्ञा दिली. तुकारामांचे अभंग व कीर्तन लोकांना प्रभावित करु लागले. त्यामुळे देहू परिसरातील कर्मठ लोक तुकारामांचा द्वेष करु लागली. प्रकरण न्यायालयापर्यंत गेले. यामुळे तुकारामाच्या अभंगवाणीच्या वह्या स्वतः तुकारामाला इंद्रायणीच्या डोहात बुडवाव्या लागल्या. त्यानंतर तुकारामांनी अन्न पाण्याशिवाय इंद्रायणीकाठी तेरा दिवसापर्यंत निर्वाण मांडले होते. परंतु या त्यांच्या अभंगवाणीच्या वह्या लोकांनी तारल्या. संत तुकारामांची ही कीर्ती ऐकून छत्रपती शिवरायांनी त्यांना सन्मानित करण्यासाठी आपले सैन्य पाठवून पाचारण केले. परंतु संत तुकारामांनी छत्रपती शिवरायास आपली नम्रपणे भेट नाकारुन आपल्या अभंगवाणीतून शिवरायांचा गौरव केला आहे. 'अणुरेणुया थोकडा। तुका आकाशाएवढा।' त्यांना आत्मसाक्षात्कार झाला आणि शके १५७३ रोजी संत तुकारामांनी जगाचा निरोप घेतला.

संत तुकारामांची कविता

संत तुकारामाची अंभगवाणी व त्यांचे व्यक्तिमत्त्व हे मेणाहून मऊ आणि वज्रापेक्षाही कठोर आहे. तुकारामांच्या आत्माविष्काराचे प्रभावी माध्यम म्हणजे त्यांची अभंगवाणी होय. त्यांच्या अभंगवाणीत मानवी जीवनाचा विचार आहे. तुकारामांच्या अभंगवाणीने मराठी भाषेला अधिक श्रीमंत केले आहे. तुकारामांनी साधारणतः सोळा-सतरा वर्ष अखंडपणे अभंग रचना केली. सामान्यपणे त्यांनी साडेचार हजारापेक्षाही जास्त अभंग रचनांचे लेखन केले आहे. तुकारामांची कविता ही सज्जनाचा, साधूंचा, वैष्णवाचा गौरव करते, त्याचबरोबर दुर्जनांचा, ढोंगी साधुंचा व दांभिकांचाही तितकाच धिक्कार करते. त्यांची कविता ही एखाद्या विचारवंतांची जशी भाव कविता आहे, तशीच ती उपदेशपर कविताही आहे. त्यांच्या कवितेतील अनुभव विश्व अधिक व्यापक आहे. विठ्ठल हाच त्यांचा सर्वार्थाने गुरु व देव होता. नामदेव व पांडूरंगाच्या आदेशाप्रमाणे मला कवित्वाची प्रेरणा मिळाल्याची कबुली स्वतः तुकारामांनीच दिलेली आहे. म्हणूनच विठ्ठल हाच तुकारामांच्या काव्याचा मूलस्त्रोत आहे.

संत तुकारामांच्या काव्यात भक्तीची प्रेरणा आहे. त्यांच्या भक्तीमध्ये ओढ, आकर्षण, तीव्रता आहे. त्यांनी आपल्या काव्यातून नीतीधर्माचा प्रसार आणि प्रचार केला. ढोंगीपणा, खोटेपणा यावर आघात करीत दुर्जनांचे त्यांनी वाभाडे काढले. पोपटपंची करीत कीर्तन-प्रवचन करणाऱ्यावरही टीकास्त्र सोडले. संत तुकारामाची अभंगवाणी ही त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विमुक्त आविष्कार आहे.

संत तुकारामांच्या काव्याची अनेक बलस्थाने असून त्यात प्रामुख्याने भाव कविता, आत्मप्रकटीकरण, सुभाषितमयता, अस्सल मराठमोळी वाणी, आवाहन क्षमता, जीवनचिंतन, प्रतिमासृष्टी, अफाट अनुभवविश्व या बलस्थानांचा प्रामुख्याने निर्देश करावा लागतो.

त्यांच्या कवितेची व्याप्ती आणि त्यातील विविधता ही व्यापक स्वरुपाची आहे. बालक्रीडेचे अभंग, आत्मचरित्रपर अभंग, प्रासंगिक अभंग, जीवनकार्य-धर्मरखणविषयक अभंग, भक्तीविषयक अभंग, उपदेशविषयक अभंग, समाजप्रबोधन अशा विषयावरील त्यांच्या अभंगवाणीची विविधता दिसून येते. एकंदरीत संत तुकारामांची अंतर्बाह्य प्रतिमा म्हणजेच त्यांची कविता म्हणता येईल, त्यांची कविता अधिक व्यापक आहे.

तुकारामाची काव्यप्रतिमासृष्टी

संत तुकारामांची कविता ही वैश्विक आहे. त्यांची कल्पकता व बुद्धिमता सर्वश्रेष्ठ आहे. तुकारामांच्या काव्याची प्रतिमासृष्टी ही अभिजात आहे. अल्पाक्षरत्व, ताजेपणा, नवनिर्मिती, नवार्थदर्शन, परिणामकारकता ही त्यांच्या प्रतिमासृष्टीची वैशिष्ट्ये आहेत. देवद्वार व देवीवर हा त्यांच्या अभंगाचा छंद आहे. त्यात वैविध्य आणि विपुलता आहे. त्यांची प्रतिमानसृष्टी अर्थघन व ताजेपणा दर्शविणारी असून ती आशयाला अनुरुप आहे. 'माता' या त्यांच्या प्रतिमेत उपमानसृष्टीची विविधता आहे. तुकारामांच्या कवितेतील प्रतिमा चिरंतर आहेत. 'तुकारामांचे उत्कट भावजीवन अतिशय सार्थपणे व समर्थपणे ही प्रतिमाने वाचक-श्रोत्यासमोर उभे करतात. तुकारामाची काव्यशक्ती कशी अव्वल दर्जाची होती व कवी यादृष्टीने तुकारामाचे स्थान किती श्रेष्ठ दर्जाचे होते याचे सूंदर दिग्दर्शन त्यांची प्रतिमानसृष्टी करते.'[१]

तुकारामांच्या काव्याची भाषा

संत तुकारामांच्या कवितेची भाषा बंड करणारी आहे. त्यांची कविता ही माणसांचे हृदय खुले करणारी आहे. त्यांच्या काव्याची भाषा ही संवादी, अवतरण क्षमता, आशय घनता, प्रतिमासृष्टी, अल्पाक्षर रमणीयत्व, नादमयता, अर्थघन शब्द, अलंकारिकता, दोषरहितता, सूचकता, विनोद-उपहासप्रचुरता, अनुभव संपन्नता, भाषाशैली यासारख्या अनेक वैशिष्ट्यांनी सजलेली व नटलेली आहे. संत तुकारामाची कविता ही केवळ एकाच व्यक्तीशी संवाद करीत नाही तर ती बहुसंवादी आहे. त्यांची प्रत्येक स्फूट कविता अवतरण असते. 'उपमय असो वा उपमान असो, त्याचे आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या द्वंदातील मार्गाने सत्य शोधून काढणे, हेच तुकारामांच्या कवितेचे कार्य असल्याने त्यांच्या कवितेत नानाविध सत्यरुपे सतत ये-जा करीत असतात आणि म्हणूनच त्यांची कविता साकल्याने, विभागशः व घटकशः अवतरणक्षम होऊ शकते'[२] तुकारामाची कविता भाववृत्तीनुरुप व आशयानुसार कठोर व दाहक बनते. नादमयता हा तुकारामांच्या कवितेचा प्रमुख कणा आहे. त्यांनी आपल्या धारदार वाणीने ढोंग, दंभ, लोभी यांच्यावर घणाघाती प्रहार केले. वा.ल. कुलकर्णी यांनी 'तुकारामांची वाणी ही अस्सल मराठमोळा आहे, ती शिष्टांची भाषा नाही, ती आपले सर्व सामर्थ्य लोकभाषेतून घेते' असे म्हटले आहे. त्यांच्या कवितेची भाषा ही प्रासादिक आहे. तुकारामाचे अभंग म्हणजे एक प्रकारे लोकभाषाच आहे. त्यांची अभंगवाणी ही मराठीतील लोककाव्याचा महान आदर्श आहे. 'ही वाणी म्हणजे तुकारामांच्या व्यक्तित्वाचा विमुक्त आविष्कार आहे. तुकारामाची अभिव्यक्ती ही नेहमीच दिलखुलास असते. तिच्यात एक प्रकारचा बेधुंद विमुक्तपणा असतो. खुरटेपणा तिला ठाऊक नाही. भरघोसपणा हे तिचे वैशिष्ट्य आहे. तिच्यातून व्यक्त होणारे भावानुभव हेही रसरसलेले असतात. त्यात एक प्रकारची सजीवता व सामर्थ्य असते'[३]

तुकारामांची चिंतनशीलता

संत तुकारामांची उपदेशवाणी ही वेदांहूनही श्रेष्ठ आहे. म्हणूनच तुकारामांचे चिंतन हे सखोल आणि सर्वव्यापक स्वरुपाचे आहे. तुकारामांच्या अभंगातील सगुण -निर्गुण, द्वैत-अद्वैत, माया, ब्रम्ह, धर्म, बंधुभाव, अहिंसावाद, विठ्ठल-पंढरी याविषयीची त्यांची चिंतनशीलता प्राधान्याने प्रकट होते. तुकारामांच्या कवितेत वैश्विक मानवतावाद आहे. जगाच्या कल्याणाचे त्यात उद्‌गार आहेत. त्यांची चिंतनशीलता समजाधिष्ठीत आहे. ज्यांच्या अंगामध्ये दया, क्षमा, शांती आणि अहिंसा असणारा माणूसच हा खऱ्या अर्थाने श्रेष्ठ असतो, म्हणून तुकारामांनी पशुपक्ष्यांचे बळी दिल्या जाणाऱ्या क्षुद्र दैवतांचा कडक शब्दात निषेध केला आहे. म्हणूनच त्यांचे नीतिशास्त्र रोखठोक आहे. 'तुकारामांच्या सामाजिक चिंतनाला विवेकाचे अधिष्ठान आहे. त्यांच्या भक्तियोगात कर्तव्य विन्मुखता नाही. गती शून्यता तर मुळीच नाही. प्रेयस आणि श्रेयस यातील फरक त्यांनी नीरक्षीरन्यायाने स्पष्ट केला आहे. अहिंसा, स्वावलंबन व चारित्र्यसंपन्नता यावर त्यांनी भर दिला आहे. षड्‌रिपू जिंकावेत, लोखंडाचे चणे खावेत, तेव्हाच ब्रह्मपदी नाचता येते. तुकोबांचे सामाजिक दृष्टेपण केवळ अपूर्व आहे.'[४] संत तुकारामाच्या अद्वैतवाद, सर्वानुभूती समभाव, बंधुभाव, अहिंसावाद, इहवाद, लोकतत्त्वे, यासारख्या त्यांच्या विचारसरणीच्या मुळाशी त्यांची अद्वैतदृष्टी आहे.

तुकारामांचा भक्तियोग

संत तुकारामांच्या मनाप्रमाणे ईश्वर आणि भक्त यांचे मते अन्योन्य असते. भक्तामुळे देवाला आणि देवामुळे भक्ताला सार्थकता प्राप्त होते. संताच्या विभूती देवच असतात. देव आणि भक्त एकाच परब्रम्हाचे भाग आहेत. विठ्ठल हाच तुकारामांचा जीवनाधार आहे. विठ्ठलच्या चरणी एकरुप होऊन राहण्यात तुकारामांना आपल्या जीवनाची सार्थकता वाटते. भक्ताचा आचार निर्मळ असतो व भक्ताच्या ठिकाणी नम्रता असते. संत तुकारामांनी खऱ्या भक्ताची अनेक लक्षणे सांगून ढोंगी भक्तामुळे धर्माचा लोप होतो, बाह्य ढोंग संपादन करुन खरे भक्त होता येत नाही. असे सांगून ढोंगी भक्ताचा त्यांनी तीव्र निषेध केला आहे. संत तुकारामांचे संपूर्ण जीवन पंढरीनाथाने व्यापले आहे. विठ्ठल म्हणजे सर्व शास्त्रांचे आणि वेदांचे सार असल्याचे सांगून तुकारामांनी पंढरी हे सर्व तीर्थांचे माहेर असल्याचे वर्णन आपल्या अभंगातून केले आहे. यातून त्यांच्या भक्तियोगाचे दर्शन होते.

कवितेतील सामाजिकता

संत तुकारांनी समाजातील सत्प्रवृत्तीचा गौरव करीत कुप्रवृत्तीवर हल्ला चढविला. यातूनच त्यांच्या सामाजिकतेची कल्पना येते. अनिष्ठ रुढी परंपरा, दांभिकता, ढोंगीपणा आणि अंधश्रद्धा यावर घणाघाती प्रहार करीत तत्कालीन समाजात नीतिमत्तेचे बीजारोपण केले. समतेच्या मूल्याची पेरणी केली. संत तुकारामाच्या कवितेतील सामाजिकता ही सर्वोच्च आहे. समाजातील सामान्य माणसांना छळणारा गुंड हा आमचा शत्रू आहे, चांडाळाप्रमाणे त्याला दूर ठेवा अशी त्यांनी आपल्या काव्यातून आवाहन केले आहे. समाजातील दांभिकतेला तुकारामांनी कडाडून विरोध केला आहे. 'फुलासंगे मातीस वास लागे।' यातून तुकारामांनी संतांचा गौरव केला आहे. जगातील सर्वच वस्तू विष्णुमय आहेत, समान आहेत हाच खरा वैष्णव धर्म असल्याचे त्यांनी आपल्या भक्तांना स्पष्टपणे सांगितले आहे. 'जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे आपुले।। तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।' यातून तुकारामांनी रंजल्या गांजल्याशी प्रेमाने वागणारा साधू हा प्रत्यक्ष परमेश्वरच असतो हे स्पष्ट केले आहे. अंधश्रद्धा व शुद्र दैवते यावरही त्यांनी टीकास्त्र सोडले. 'नवसे कन्यापुत्र होती। तरी का करणे लागे पती।' असे ठामपणे ठणकावून सागितले. निष्पाप बकऱ्याची मान कापणाऱ्या निष्ठूरपणाला सीमाच उरलेली नाही. यावरही तुकारामांनी हल्ला चढविला आहे. सांसारिक माणसांना उपदेश करीत या सांसारिक माणसाला तुकारामांनी ताठ मानेने उभे करुन या माणसाला सुसंस्कृत बनण्यासाठी त्यांनी आग्रह धरीत समाजातील अनेक कुप्रवृत्तींचे त्यांनी वस्त्रहरण केले.

वाङ्मयीन श्रेष्ठत्व

संत तुकाराम हे साक्षात्कारी संत आणि लोकशिक्षक होते. अभंगवाणीतील त्यांचे शब्द धारदार व तीक्ष्ण असून तुकारामांचे अभंग भावगीत आहेत. त्यांनी आपल्या काव्यात जीवनाची शाश्वत मूल्ये मांडली आहेत. म्हणूनच संत तुकाराम हे तत्कालीन समाज जीवनाचे श्रेष्ठ भाष्यकार आहेत. उच्च जातीत अथवा वर्णात जन्म झाल्याचा अभिमान, अंधश्रद्धा, वेदपठण, कर्मकांड, ढोंगीपणा अशा अनेक दुष्ट रुढींवर त्यांनी हल्ला चढविला. तुकारामांची निष्काम भक्ती भावनेवर श्रद्धा असून त्यांनी सगुण भक्तीचा पुरस्कार केला आहे. माणसांनी नम्र आणि क्षमाशील असावे व मूल्यरक्षणार्थ निष्ठूर व्हावे असे ठणकावून सांगितले. म्हणूनच बंडखोरी हा त्यांच्या व्यभिमत्त्वाचा मुख्य पैलू आहे. त्यांचे अनुभवविश्व विशाल आहे. त्यांची उपमानसृष्टी व प्रतिमानसृष्टी संपन्न आहे. भगवत् भक्तीचा गौरव, प्रापंचिकांना उपदेश, आत्मानुभवाचा आविष्कार आणि भागवत पंथाचा प्रचार हे तुकारामांच्या काव्याचे मुख्य प्रयोजन आहे. त्यांच्या कवितेमध्ये मानवी जीवनाचा करुणामय आविष्कार आहे. म्हणूनच तुकारामांची समग्र अभंगवाणी ही भक्तीच्या करुणामय प्रवाहाने भिजलेली आहे.

निष्कर्ष

- आत्महिताचा घात करणाऱ्या संसारामुळे नारायणाची व आपली भेट होत नाही, दर्शन होत नाही, यामुळेच संत तुकारामांना सांसारिक वैराग्य प्राप्त होऊन ते भक्ती मार्गाकडे वळले.
- तुकारामांच्या अभंगवाणीचा प्राण म्हणजे तिच्यातील असलेली प्रबळ आत्मनिष्ठा होय.
- त्यांची कविता ही भाव कविता व उपदेशपर कविता असून जीव-जगत् आणि जगदीश्वर या तिघांचाही वेध घेणारी त्यांची समृद्ध व व्यापक कविता आहे.
- तुकाराम हे शुद्ध आचरणावर भर देणारे नैतिकतावादी सद्भक्त संतकवी होते, म्हणूनच त्यांच्या काव्य उपदेशात आत्मशुद्धी, आत्ममंथन, अहिंसा, करुणा, क्षमा, शांती यासारख्या अनेक शाश्वत मूल्यांचे दर्शन होते.
- विठ्ठलभक्ती, नीतिधर्माचा प्रचार-प्रसार, अवगुण दंडण, आत्माविष्कार हे तुकारामांच्या कवितांच्या प्रेरणा असून भावकविता, आत्मप्रकटीकरण, सुभाषितमयता, आवाहन क्षमता, जीवन चिंतन, प्रतिमासृष्टी, अफाट अनुभवविश्व ही त्यांच्या कवितांची

बलस्थाने आहेत. त्यांच्या कवितांची व्याप्ती लक्षणीय आहे. त्यात विविधता आहे. त्यांचे सर्वच अभंग वा कविता संवादरुप आहेत. तुकारामांची प्रतिमासृष्टी ही पारंपरिक आणि व्यावहारिक असली तरी ती तत्कालीन संस्कृतीची द्योतक असून ती आत्मानुभूतीवर आधारलेली आहे.

- तुकारामांची कविता कधी भक्तीचा पवित्रा घेते, कधी युद्धाचा, कधी धर्म-अधर्माचा तर कधी देवाशी भांडण करते. म्हणूनच त्यांच्या अभंगवाणीतील प्रत्येक शब्द अर्धघन स्वरुपाचा आहे. तुकारामांच्या अभंगवाणीतील भेदकता, बुद्धीचे स्वातंत्र्य आणि आत्माविष्कार या गुणांमुळेच त्यांचे काव्य श्रेष्ठ काव्य ठरले आहे.
- कपाळावर गंध, गळ्यात तुळशीमाळ, नामस्मरण, पाठांतर, उपवास, देवदर्शन अशा ढोंगी, भोंदू दांभिकतेचा तुकारामांनी अत्यंत कठोर शब्दात समाचार घेतला अहे.
- तुकारामांच्या अभंगवाणीत वैश्विक मानवतेचा उद्घोष असून त्यांनी भिक्षावृत्तीचा निषेध केला आहे.
- वेद, शास्त्रे, पुराणे यांचे एकच नाम म्हणजे विठ्ठल नाम असून विठ्ठल म्हणजे ओकांराचे बीज आहे. तर पंढरी ही सर्व तीर्थांना पवित्र करणारे माहेरघर असल्याची साक्ष तुकारामांनी आपल्या अभंगातून दिली आहे.
- संत तुकारामांची कविता जशी आत्मनिवेदनपर आहे, तशीच ती आत्मनिष्ठ व समाजनिष्ठही आहे. त्यांच्या कवितेला स्वतःचा नाद व ताल आहे. त्यांच्या अनेक उद्गारांनी मराठीत अनेक म्हणींचा दर्जा प्राप्त करुन दिला आहे.

संदर्भ ग्रंथ

१. डॉ. पाटील मालती, तुकारामांची प्रतिमान सृष्टी व त्यांच्या काव्यात्मशक्तीचे मूल्यमापन, नागपूर विद्यापीठ प्रकाशन, नागपूर.
२. जाधव रा.ग., आनंदाचा डोह, प्राज्ञ पाठशाळा, वाई.
३. कुलकर्णी वा.ल., वाङमयीन टीपा आणि टिप्पणी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
४. दोडे अरविंद (संपा.), तुकारामदर्शन, सुदर्शन प्रकाशन, मुंबई.
५. एका लेखकाचा अभ्यास, मध्ययुगीन तुकाराम, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक.

डॉ. माधव बसवंते